आधुनिक विचारांचे

# वर्तमान

बीड । शुक्रवार, १२ फेब्रुवारी २०२१ । वर्ष : ३ — आपले वृत्तपत्र, आपला आवाज — अंक : १६ । पाने : ४ । मूल्य २ ₹

## जिल्ह्यातील सरपंच निवडीचा मार्ग मोकळा



बीड : येत्या १५ ते १७ फेब्रुवारी दरम्यान जिल्ह्यातील १२९ सरपंच निवडीसाठी तहसीलदारांनी विशेष सभा लावून ही प्रक्रिया पार पाडावी, असे आदेश जिल्हाधिकारी रविंद्र जगताप यांनी तहसीलदारांना दिले आहेत. कोरोनाच्या अनुषंगाने मुदत संपलेल्या ग्रामपंचायतींवर सहा महिने प्रशासक होते. अखेर ग्रामविकास विभागाने निवडणूक आयोगाची परवानगी घेऊन या ग्रामपंचायतींच्या निवडणुका घेतल्या. मात्र, निवडणूक प्रक्रिया पार पडून महिनाभराचा कालावधी लोटला तरी सरपंचाच्या निवडी होत नव्हत्या.

**विशेष संपादकीय**

## आक्रमक तेवढाच अभ्यासू नेता

दिल्लीच्या तख्यावर शेतकऱ्यांचा 'मोदी विरोधी' लढा अधिक तीव्र झाला असताना महाराष्ट्र काँग्रेस



समितीचे अध्यक्षपद एका शेतकरी नेत्याकडे आले, याला निश्चित अर्थ आहे. अगदी अपेक्षितपणे नाना पटोले यांच्याकडे काँग्रेस प्रदेशाध्यक्षांची धूरा आली. एक आक्रमक नेता म्हणून नाना पटोले यांची प्रतिमा आहे. काँग्रेसच्या अखिल भारतीय किसान आघाडीचेही नाना पटोले अध्यक्ष आहेत. केंद्रात मोदी विरोधी चेहरा, राज्यात ओबीसी नेता म्हणूनही काँग्रेसने त्यांच्याकडे राज्याची सूत्रे सोपविली आहेत.

सामान्य शेतकरी कुटूंबात जन्म घेतलेले नाना पटोले 'संघर्षमय' व्यक्तीमत्व आहे. शेतकऱ्यांचा 'वाली' म्हणून सत्तेची गणितं मांडतांना कधी नफ्या-तोट्याची पर्वा न करणारा निर्भीड नेता म्हणून पटोले यांची देशभर ख्याती आहे. भाजपचे खासदार असताना चक्क मोदींना शेतकऱ्यांच्या प्रश्नांवरून खडेबोल सुनावणारे पटोले बंडखोर नेतृत्व आहे. भाजपात अल्पकाळ राहून बंडाची भाषा करणाऱ्या पटोलेंनी केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या विरोधात लोकसभा लढविली. राज्यात भाजपची सत्ता असताना तत्कालीन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली महाजनादेश यात्रा निघाली. या यात्रेला प्रत्युत्तर देण्यासाठी पटोलेंनी महापर्दाफाश यात्रा काढून भाजपची तारांबळ उडवून दिली होती. ओबीसींची जातीनिहाय जनगणना व्हावी, ही मागणी लावून धरणारे पटोले यांना काँग्रेसने मानाचे स्थान दिले आहे. राज्यात उध्दव ठाकरे यांच्या नेतृत्वाखाली महाविकास आघाडी सत्तेवर आल्यानंतर पटोले यांच्याकडे विधानसभा अध्यक्षपद आले. अल्पकाळ का होईना या पदाला न्याय देण्याचा प्रयत्न पटोले यांनी केला आहे. आक्रमक शैलीचा हा अभ्यासू नेता विदर्भातील साकोली विधानसभा मतदारसंघाचे नेतृत्व करत आहे. काँग्रेसला राज्यात नवसंजीवनी मिळवून देण्यासाठी नाना पटोले यांच्यावर मोठी जबाबदारी दिली आहे. काँग्रेस हायकमांडने प्रदेश कार्यकारिणीची पुनर्रचना करताना कार्याध्यक्ष आणि उपाध्यक्षांची तगडी टीम स्थापन केली आहे. राज्यात काँग्रेसची 'घडी' नीट बसवताना पटोले यांच्यासमोर आव्हाने असतील मात्र ते लीलया पेलतील असे त्यांच्या आजवरच्या कार्यपध्दतीवरून लक्षात येते. तूर्त शेतकरीपुत्राला नव्या इनिंगसाठी शुभेच्छा देऊया!

■ बाबा श्रीहरी देशमाने

## 'वर्तमान'च्या विविध पुरस्कारांचे आज वितरण

### माधव निर्मळ, रमेश सोळंके, सारंग मिटकरी, सुभाष नाकलगावकर यांचा सन्मान

▶ प्रतिनिधी

माजलगाव : वर्तमान फाऊंडेशन आणि वर्तमान माध्यम समूह आयोजित विविध पुरस्कारांचे १२ फेब्रुवारी रोजी दुपारी २ वाजता येथील व्यंकटेश कॉन्फरन्स हॉलमध्ये वितरण होणार आहे. या सन्मान सोहळ्यात माधव निर्मळ (उद्योग भूषण), रमेश सोळंके (समाज भूषण), सारंग मिटकरी (समाज भूषण), सुभाष नाकलगावकर (पत्रकार भूषण) आदींना पुरस्कार प्रदान करण्यात येतील.

सन्मान सोहळयाच्या अध्यक्षस्थानी माजलगावचे आमदार प्रकाश सोळंके, उद्घाटक म्हणून मुंबई कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती अशोक डक तर शिवसेना वैद्यकीय मदत कक्षाचे प्रमुख मंगेश चिवटे यांच्या शुभहस्ते पुरस्कार वितरण होणार आहे. तर कार्यक्रमाला विशेष निमंत्रित म्हणून भाजपा नेते रमेश आडसकर, बहुजन विकास मोर्चाचे अध्यक्ष बाबुराव पोटभरे, सचिन मुळुक, भाजपा नेते मोहन जगताप, जयसिंग सोळंके, कल्याण आबुज, नगराध्यक्ष मंजूर शेख, पं.स.सभापती सोनाली भागवत खुळे, सभापती संभाजी शेजुळ, खरेदी-विक्री संघाचे चेअरमन एन.टी.सोळंके, पं.स.उपसभापती डॉ.वसिम मनसबदार, जि.प.सदस्य प्रा.प्रकाश गवते, भाजपा तालुकाध्यक्ष अरूण राऊत, शिवसेना तालुकाप्रमुख आप्पासाहेब जाधव, भाजपा नेते नितीन नाईकनवरे, ॲड.भानुदास डक, भाई ॲड.नारायण गोले पाटील, नगरसेवक ॲड.तौफिक पटेल, जयदत्त नरवडे, वंचित आघाडीचे प्रवक्ते धम्मानंद साळवे, सरपंच दत्ता नाईकनवरे, शेतकरी संघर्ष समितीचे गंगाभिषण थावरे, पं.स.सदस्य शशांक सोळंके, मानवी हक्क अभियानचे जिल्हाध्यक्ष राजेश घोडे आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत, अशी माहिती कार्यक्रमाचे निमंत्रक चंद्रकांत शेजुळ, भगीरथ तोडकरी यांनी दिली.

**यांचा होणार विशेष सन्मान**

'वर्तमान' आयोजित सन्मान सोहळ्यात डॉ.यशवंत राजेभोसले, डॉ.प्रसाद कुलकर्णी, गौरव ओम शर्मा, बाबा श्रीहरी देशमाने, प्रकाश काशिद, दत्ता येवले आणि सोन्या सोळंके यांचा विशेष सन्मान होणार आहे. माजलगाव तालुका सहकारी पतसंस्था फेडरेशनला सहकार भूषण सन्मान प्राप्त झाला असून फेडरेशनच्या पदाधिकाऱ्यांचा गौरव होणार आहे.

## 'सिंघम रिटर्न'ची दिंद्रुडकरांना प्रतीक्षा

### पीएसआय विजेंद्र नाचन यांच्या कार्याची ग्रामस्थांना आठवण



▶ विशेष प्रतिनिधी

दिंद्रुड : दिंद्रुड पोलीस ठाण्याचे तत्कालीन पीएसआय विजेंद्र नाचन यांच्या प्रभावी कामाची आठवण दिंद्रुडकरांना वारंवार येत आहे. दरम्यान, सिंघम स्टाईलने परिसरातील अवैध धंद्यांचा कर्दनकाळ ठरलेले विजेंद्र नाचन यांची दिंद्रुडला बदली व्हावी, अशी मागणी सर्व स्तरातून होत आहे.

दिंद्रुड पोलीस ठाण्याचे तत्कालीन पीएसआय विजेंद्र नाचन ऊर्फ सिंघम यांनी आपल्या अल्पकाळातील सेवेतून दिंद्रुडकरांची मने जिंकली. नाचन यांच्या सिंघम स्टाईलमुळे परिसरातील अवैध धंद्यांचे कंबरडे मोडले होते. हातभट्टीसह इतर अवैध धंद्यावाल्यांचे धाबे दणाणले होते. नाचन यांच्या कार्यकाळात वाहतूक व्यवस्थेसह कायदा सुव्यवस्था सुरळीत झाली होती.

अशा कर्तव्यदक्ष अधिकाऱ्याची दिंद्रुडकरांना प्रतीक्षा लागली आहे. बीड येथे बदली झालेले पीएसआय विजेंद्र नाचन यांनी पुन्हा दिंद्रुड पोलीस ठाण्याला रूजू होण्यासाठी वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांनी त्यांची दिंद्रुड येथे बदली करावी अशी मागणी दिंद्रुड पंचक्रोशीतून होत आहे. दिंद्रुड परिसरातील अवैध धंद्यांवर लगाम घालण्याचे काम करण्याबरोबरच सर्वसामान्यांमध्ये पोलिस दलाविषयी विश्वास निर्माण करण्याचे काम नाचण यांनी केले होते.

**एपीआय अनिल गव्हाणकर यांच्या समोर अवैध धंद्यांचे आव्हान**

दिंद्रुड पोलीस ठाणे अंतर्गत येत असलेल्या गावांत विविध अवैध धंदे डोके वर काढत आहेत. हातभट्टी दारूसह वाळु तस्करी आणि अवैध वाहतूक अक्षरशः बोकाळली आहे. परिसरातील वाढते अवैद्य धंदे रोखणे दिंद्रुडचे एपीआय अनिल गव्हाणकर यांच्यासमोर मोठे आव्हान आहे. दिंद्रुड परिसरात सुरू असलेल्या अवैद्य धंद्यांना अभय कुणाचा असा संतप्त सवाल नागरिक विचारीत आहेत.



## वनपरिक्षेत्र कार्यालयास 'आयएसओ' मानांकन

### राज्यातील पहिला तालुकास्तरीय मान

▶ प्रतिनिधी

धारूर : अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या एकजूटीने केलेल्या कामामुळे येथील येथील वनपरिक्षेत्र कार्यालय आयएसओ मानांकन प्रमाणपत्र मिळवणारे राज्यातील पहीले तालुकास्तरीय कार्यालय ठरले आहे. कार्यालयाचा चेहरा मोहरा बदलला असून या कार्यालयास नुकतेच आयएसओ मानांकन प्रमाणपत्र देऊन गौरव करण्यात आला.

येथील वनपरिक्षेत्र कार्यालयातील सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांनी कोरोना लॉकडाऊ ननंतर एकजूटीने कार्यालयाचा चेहरामोहरा बदलला आहे. या कठीण काळाचा सदुपयोग केला या मेहनतीचे फळ आता मिळाले असून हे तालूका वनकार्यालय राज्यातले पहिले आयएसओ मानांकन प्राप्त वनपरिक्षेत्र कार्यालय ठरला आहे. मानांकनांचा गौरव सोहळा नुकताच पार पडला. यावेळी विभागीय वनअधिकारी एम.बी. तेंलग, नायब तहसीलदार प्रकाश गोपड, आयएसओ समन्वयक प्रा.प्रशांत जोशी, अमोल कांबळे, परळीचे वन परीक्षेत्र अधिकारी भगवान गित्ते, धारूरचे वनपरीक्षेत्र अधिकारी एम. एस. मुंडे, एम.एस. बहीरलवाल, शंकर वरवटे, वनपाल कस्तुरे आदी अधिकारी-कर्मचाऱ्यांची उपस्थिती होती.प्रास्ताविक एम.बी.मुंडे यांनी तर आभार वन परिमंडळ अधिकारी शंकर वरवटे यांनी व्यक्त केले.

## सहाल चाऊस यांना 'सर्वोच्च जामीन'

▶ प्रतिनिधी

माजलगाव : येथील नगरपालिकेचे माजी नगराध्यक्ष सहाल चाऊस यांना अपहाराच्या प्रकरणात सर्वोच्च न्यायालयाने मंगळवारी झालेल्या अंतिम सुनावणीत जामीन मंजूर केला आहे. जेष्ठ विधिज्ञ कपिल सिब्बल यांनी न्यायालयासमोर चाऊस यांची बाजू मांडली. औरंगाबाद उच्च न्यायालयातील ॲड.सय्यद तौसिफ यांनी सहकार्य केले. या निर्णयामुळे चाऊस यांना मोठा दिलासा मिळाला असून जामीन मंजूर झाला आहे.



माजी नगराध्यक्ष सहाल चाऊस यांच्यासह तत्कालीन मुख्याधिकारी, लेखापाल यांच्याविरुद्ध नगरपालिकेअंतर्गत २२ कामांमध्ये अपहार केल्याच्या तक्रारीवरून गुन्हा दाखल झाला होता. सदरील प्रकरणात मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने जामीन अर्ज फेटाळला होता. त्यामुळे सहाल चाऊस यांच्या वतीने जेष्ठ विधिज्ञ सुधांशू चौधरी यांच्यामार्फत दिल्लीतील सर्वोच्च न्यायालयात प्रकरण दाखल केले होते. सर्वोच्च न्यायालयाने सहाल चाऊस यांना यापूर्वी अंतरिम जामीन मंजूर केला होता. या प्रकरणावर सर्वोच्च न्यायालयात मंगळवारी अंतिम सुनावणी होती. यावेळी जेष्ठ विधिज्ञ कपिल सिब्बल यांनी न्यायालयासमोर चाऊस यांची बाजू मांडली, अंतिम सुनावणीत सर्वोच्च न्यायालयात सहाल चाऊस यांना अपहाराच्या एका प्रकरणात जामीन मंजूर केला आहे. चाऊस यांच्यासह इतरांविरूद्ध दोन गुन्हे दाखल झाले होते. त्यातील एका प्रकरणात त्यांना जामीन मंजूर झाल्याने मोठा दिलासा मिळाला.

## रोहयो समितीच्या अध्यक्षपदी श्रीहरी मोरे

▶ प्रतिनिधी

माजलगाव: माजलगाव तालुका पंचायतस्तरीय रोजगार हमी योजना समितीच्या अध्यक्ष पदी पुरुषोत्तमपुरी येथील श्रीहरी मोरे यांची नियुक्ती करण्यात आली आहे, या निवडीबद्दल त्यांचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.आमदार प्रकाश सोळंके यांच्या शिफारशीवरून बीडचे पालकमंत्री धनंजय मुंडे यांनी माजलगाव तालुक्यातील पंचायतस्तरीय रोजगार हमी योजना समिती गठीत केली आहे.



## डॉ.प्रशांत राजेभोसले यांच्या वेबसाईटचा दुबईत बोलबाला

▶ प्रतिनिधी

माजलगाव : शहरातील एका मराठी माध्यमाच्या शाळेत शिक्षण घेऊन वैद्यकीय क्षेत्रात नावलौकिक मिळवणारे डॉ.प्रशांत राजेभोसले यांची कीर्ती आंतरराष्ट्रीय स्तरावर झळकली आहे. बालरोग तज्ञाचे शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी अत्यंत उपयुक्त ठरणाऱ्या त्यांच्या पुस्तकाचे प्रकाशन आंतरराष्ट्रीय स्तरावर झाले आहे. एवढेच नव्हे तर बालरोगतज्ञ अभ्यासक्रमाच्या शिक्षणाचे परिपूर्ण ज्ञान देणाऱ्या मेंटोर वेबसाईटचा दुबईतील शारजात मोठा बोलबाला झाला आहे. माजलगावच्या या भूमिपुत्राने अटकेपार फडकवलेल्या झेंड्यामुळे डॉ.प्रशांत राजेभोसले यांचे सर्वत्र कौतूक होत आहे.



माजलगाव येथील सिद्धेश्वर विद्यालयात मराठी माध्यमातून डॉ.प्रशांत राजेभोसले यांनी शिक्षण घेतले. वडील प्रकाशराव राजेभोसले शहरातील सुंदरराव सोळंके महाविद्यालयात प्राध्यापक असल्याने लहानपणापासूनच शिक्षणाची गोडी लागली. डॉ.प्रशांत राजेभोसले यांनी पुढे अमरावती येथे वैद्यकीय शिक्षण घेऊन बालरोग तज्ञाची सुपर स्पेशालीस्ट म्हणून पदव्युत्तर पदवी घेत दुबई येथील शारजात स्थाईक झाले.

## 'आरोग्यदूत' मंगेश चिवटे



■ भगीरथ तोडकरी

**शिवसेना वैद्यकीय मदत कक्षामार्फत गरजू रूग्णांना, गरीबांना तत्परतेने मदत केली जात आहे. या कक्षाची टीम राज्यातील सर्वदूर रूग्णांच्या हाकेला 'ओ' देत आहे. कक्षप्रमुख मंगेश चिवटे 'आरोग्यदूत' म्हणून पुढे येत आहेत. चिवटे यांचे हे कार्य गोरगरीब रूग्णांना नवजीवन देणारे ठरत आहे.**

महाराष्ट्रात अनेक संघटना उदयास आल्या, मात्र कालौघात काही लुप्त झाल्या तर काही संपल्यात जमा. मात्र सह्याद्रीच्या ताठ कड्याप्रमाणे स्वाभिमानाने उभी आहे ती शिवसेना. संघटनेचे रूपांतर पक्षात झाले आणि आज महाराष्ट्राच्या मुख्यमंत्रीपदी शिवसेनेचे प्रमुख उध्दव ठाकरे विराजमान झालेत. ८० टक्के समाजकारण आणि २० टक्केच राजकारण यावर शिवसेना तग धरून आहे, असे म्हटले तर वावगे ठरणार नाही. आज सर्व पातळ्यांवर शिवसेना काम करत असताना वैद्यकीय मदत कक्ष मैलाचा दगड म्हटले तर वावगे ठरणार नाही. शिवसेना प्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या नावे १७ नोव्हेंबर २०१७ रोजी या कक्षाची स्थापना झाली.

महाराष्ट्रातील गोरगरीब आणि गरजू रूग्णांना लोकदूत म्हणून वंदनीय बाळासाहेब ठाकरे वैद्यकीय मदत कक्ष काम करत आहे. राज्याचे कणखर मुख्यमंत्री तथा शिवसेना पक्षप्रमुख उध्दव ठाकरे, पर्यावरण मंत्री आदित्य ठाकरे यांच्या मार्गदर्शनाखाली राज्याचे नगरविकास मंत्री एकनाथ शिंदे, खासदार डॉ.श्रीकांत शिंदे यांच्या संकल्पनेतून शिवसेना वैद्यकीय मदत कक्षाची स्थापना झाली आहे. बाळासाहेब ठाकरे यांच्या स्मतीदिनाचे औचित्य साधून हा कक्ष कार्यान्वीत झालेला आहे. आणि मदत कक्षाला तीन वर्षे झाली आहेत. कोरोना संकटात असो की नैसर्गीक आपत्ती, कक्षाची टीम सदैव तत्पर राहिलेली आहे. पूर्वाश्रमीचे प्रतिभावंत पत्रकार मंगेश चिवटे या कक्षाचे प्रमुख आहेत. संपूर्ण महाराष्ट्राभर आरोग्य सेवकांचे तगडे नेटवर्क उभे करण्याचे काम कक्षाने केले आहे.

आज हजारो रूग्णांना सेवा पुरविण्याचे काम टीम मंगेश चिवटे करत आहे. दुर्धर आजार त्यात महागड्या शस्त्रक्रिया अशावेळी गरजू आणि गरीब रूग्णांना तात्काळ निधी उपलब्ध करण्यासाठी कक्षाची टीम २४ तास राबत असते. कॅन्सर, ब्रेन ट्यूमर, लिव्हर, ट्रॅन्सप्लांट अशा विविध महागड्या शस्त्रक्रिया बाळासाहेब ठाकरे वैद्यकीय मदत कक्षामार्फत मोफत केल्या जातात, यासाठी पंतप्रधान सहाय्यता निधी, मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी, श्री सिद्धिविनायक ट्रस्ट, टाटा ट्रस्ट आदींकडून निधी उपलब्ध करून शस्त्रक्रिया केल्या जातात. डॉ.श्रीकांत शिंदे फाऊंडेशन या संस्थेच्या माध्यमातूनही भरीव मदत रूग्णांना आजवर केली आहे.




**राज्यात नेटवर्क उभारण्याचा मानस**

वंदनीय बाळासाहेब ठाकरे शिवसेना वैद्यकीय मदत कक्षाचे काम सध्या महाराष्ट्रातील बारा जिल्ह्यात सुरू आहे. नाशिक येथे नुकतेच खासदार संजय राऊत, खासदार डॉ.श्रीकांत शिंदे यांच्या उपस्थितीत कक्षाचे उद्घाटन झाले. संपूर्ण राज्यात शिवसेना वैद्यकीय मदत कक्षाची स्थापना करण्याचा मानस असून मंत्री एकनाथ शिंदे आणि खासदार डॉ.श्रीकांत शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली शिवसेना वैद्यकीय मदत कक्षाचे काम जोमाने सुरू असल्याची माहिती मंगेश चिवटे यांनी 'वर्तमान' बोलताना दिली.

# ‘गर्भश्रीमंतांकडून जादा टॅक्स घ्या’

**कोरोनाच्या दुसऱ्या लाटेची झळ फारशी बसली नसली तरी कोरोनामुळे भारताचं आर्थिक नुकसान जास्त झालंय. यंदाच्या बजेटमधे काय उपाययोजना हव्यात याविषयी अनेक तज्ञ लोक आपलं मत मांडतायत. यात भारतीय रिजर्व बँकेचे माजी गवर्नर रघुराम राजन यांचं म्हणणंही महत्त्वाचं ठरणारं आहे. एनडीटीवीला दिलेल्या त्यांच्या मुलाखतीचं निखील घाणेकर यांनी केलेलं हे शब्दांकन.**



२६ जानेवारीला प्रकाशित झालेल्या ऑक्सफाम अहवालानुसार साथरोगामुळे भारतातली आर्थिक असमानता वाढलीय. भारतातल्या श्रीमंतांच्या संपत्तीत ३५ टक्क्यांनी वाढ झालीय. यावर काही उपाययोजना करायच्या असतील तर येत्या बजेटमधे काही ठोस पावलं उचलावी लागतील. कोरोनानंतरचं हे पहिलंच बजेट. त्यामुळेच काही महत्त्वाच्या सूचना नोबेल पारितोषिक विजेते अर्थतज्ञ अभिजीत बॅनर्जी यांनी केल्यात.

गरीब आणखी गरीब होतात आणि श्रीमंत आणखी श्रीमंत.’ कट्ट्यावरच्या, ट्रेनमधल्या, बसमधल्या गप्पांमधे आपण हे वाक्य हमखास ऐकतो. भारतातल्या आणि जगभरातल्या सामाजिक असमानतेचं दर्शनच ही वाक्य आपल्याला करून देत असतात. आता ही वाक्य नुसत्या कट्ट्यावरच्या गप्पा राहिलेल्या नाहीत. तर ऑक्सफाम या संस्थेच्या अहवालातून समोर आलेले आकडे नेमकं हेच सांगतायत. ऑक्सफाम इंटरनॅशनल ही जगातल्या ९० देशातल्या २० एनजीओ आणि त्यांचे पार्टनर यांची मिळून बनललेली एक आंतरराष्ट्रीय संघटना आहे. गरिबीमुळे निर्माण झालेली असमानता आणि त्यातून होणारा अन्याय संपवणं हा या संघटनेचा हेतू. दरवर्षी वर्ल्ड इकोनॉमिक फोरमच्या वार्षिक मिटिंगमधे या संस्थेकडून जगातल्या आर्थिक असमानतेवरचा अहवाल प्रसिद्ध होतो. यंदा २६ जानेवारी २०२१ ला हा अहवाल प्रसिद्ध झाला. इनइक्वॅलिटी वायरस’ असं या अहवालाचं नाव आहे. इतिहासात पहिल्यांदाच सगळ्या जगातली आर्थिक असमानता एकाचवेळी वाढवण्याचा रेकॉर्ड आपल्या लाडक्या कोरोनाच्या साथरोगाने केलाय, असं या अहवालातून दिसतं. साथरोगाच्या फटक्यातून सावरायला श्रीमंतांना ९ महिने लागले. तर पुढची १० वर्ष मरस्तोवर काम केलं तरीही गरीब लोकं ही भरपाई करू शकणार नाहीत, असं या अहवालात सांगण्यात आलंय.

प्रत्येकाला मिळतील ९४ हजार

भारतातली स्थितीही अशीच बिकट असल्याचं यातून दिसतं. भारतातल्या लॉकडाऊनमुळे अर्थव्यवस्था ठप्प झाली, बेरोजगारी वाढली, उपासमार आणि स्थलांतरही झालं. मार्च २०२० पासून भारतातल्या १०० अरबपती लोकांच्या श्रीमंतीत १२,९७,८२२ कोटी रूपये इतकी वाढ झालीय. हा सगळा पैसा भारतातल्या १३.८ कोटी गरीब लोकांमधे वाटला तर प्रत्येकाच्या वाट्याला ९४,०४५ रूपये येतील. इतकी असमानता आपल्याला या अहवालातून दिसून येते. मूठभर लोकांकडे अशा प्रकारे सगळा पैसा असणं ही काही चांगली गोष्ट नाही.

ही असमानता कमी केली नाही तर अर्थव्यवस्था आणखी डबघाईला येईल. ते व्हायला नको असेल तर १ फेब्रुवारीला सादर होणाऱ्या बजेटमधे काही ठोस पावलं उचलावी लागतील. कोरोनानंतरचं हे पहिलंच बजेट असणार आहे. या बजेटमधे श्रीमंत लोकांकडून जास्तीत जास्त कर घेण्याची सूचना नोबेल पारितोषिक विजेते अर्थतज्ञ अभिजीत बॅनर्जी यांनी केलीय. इंडिया टुडेला मुलाखत देताना त्यांनी काही उपाययोजना सांगितल्यात.

बजेटरी क्रंचची परिस्थिती

अभिजीत बॅनर्जी म्हणतात, आपण नेहमी करतो ते करणं यावेळी टाळलं पाहिजे. प्रत्येक बजेटमधे प्रत्येक सरकार हा नाहीतर तो कर कमी करण्याचा मार्ग शोधत असतं. आर्थिक कर, आयात कर, संपत्तीवरचा कर असे अनेक कर कमी करण्याची संधी म्हणूनच बजेटकडे पाहिलं जातं. पण साथरोगामुळे झालेले परिणाम आपल्याला कमी करायचे असतील तर असं करून चालणार नाही. याउलट श्रीमंत लोकांकडून जास्तीत जास्त कर कसा घेतला जाऊ

**अर्थकारण**

**रेणुका कल्पना**

शकतो हेच आपल्याला यावेळी पहायला हवं. आपण बजेटरी क्रंच’मधे अडकलो आहोत, असं बॅनर्जी यांचं म्हणणं आहे. बजेटरी क्रंच म्हणजे सगळी साधनसामुग्री अगदी तुरळक प्रमाणात शिल्लक राहिलीय अशी आर्थिक परिस्थिती. त्यामुळे आपल्याला पैशाची नितांत आवश्यकता आहे. या आलेल्या पैशाचं काय करायचं हा खरंतर वेगळं बोलण्याचा विषय आहे. पण पहिले पैसा जमवण्यासाठी श्रीमंतांकडून जास्तीत जास्त टॅक्स घेण्याची तरतूद या बजेटमधे करायला हवी, असं बॅनर्जी सांगतात. अर्थव्यवस्थेत पैसा आणि संपत्तीचं पुनर्वितरण होणं फार महत्त्वाचं असतं. म्हणजे एका हाती खिळून राहिलेला पैसा, संपत्ती सगळ्यांपर्यत पोचणं गरजेचं असतं. तसंच अर्थव्यवस्था पुन्हा खेळती करायची असेल तर लोकांनी पैसा खर्च करणं, लोकांची मागणी वाढणंही गरजेचं असतं. या मागणीला चालना देण्यासाठी आम्ही असमर्थ आहेत असं सरकारकडून सांगितलं जातंय. या पुनर्वितरण आणि मागणीला चालना द्यायची असेल तर श्रीमंतांवरच्या करामधे घसघशीत वाढ करून पैसा जमवणं हे योग्यच ठरेल.

पर्स स्ट्रिंग सैल करा

कोरोना साथरोगामुळे अनेकांची वाताहात झाली. त्याचे परिणाम आजही सुरू आहेत. अनेक छोटे व्यवसाय अचानक कोसळून पडले. हे नीट करता येण्यासारखंही नाहीय. मी यासाठी कुणालाही वैयक्तिकरित्या दोषी ठरवणार नाही. पण अनेक लोकांसाठी हे मोठं संकट होतं. त्यावर पुनर्वितरण हाच मार्ग मला दिसतोय.’ यासाठी पर्स स्ट्रिंग्स सैल कराव्या लागतील, असं बॅनर्जी यांनी सांगितलंय. पर्स स्ट्रिंग्स सैल करणं म्हणजे काय तर एखाद्याला खर्चासाठी जास्त मोकळीकीचं वातावरण देणं किंवा खर्चाला त्याला पैसेच पुरवणं, असंही म्हणता येईल. या पर्स स्ट्रिंग्स सैल करण्यासाठी सरकारची भूमिका संकोची दिसते. कारण यामुळे अर्थसंकल्पातली तूट वाढेल असं सरकारला वाटतं. खरंतर ती आधीच वाढलेली आहे. पण त्यात आणखी भर पडेल आणि त्याचा परिणाम आपल्या क्रेडिट रेटिंग आणि इतर गोष्टींवर होईल, असा सरकारचा दृष्टीकोन असल्याचं बॅनर्जी म्हणतात.

सरकारची आर्थिक पुराणमतवादी भूमिका

हा दृष्टीकोन बरोबर आहे असं मला मनापासून वाटत नाही. पण सरकारची हीच भूमिका आहे.’ असं ते म्हणातात. सरकारच्या या भूमिकेला त्यांनी आर्थिक पुराणमतवादी असं म्हटलंय. म्हणजे, कमीतकमी कर घेणं, कमीतकमी सरकारी खर्च करणं आणि सरकारवर कमीतकमी कर्ज असणं. कॉर्पोरेटमधला सरकारी हस्तक्षेप कमी करणं, मुक्त व्यापार, खासगीकरण आणि करात कपात अशी आर्थिक पुराणमतवादी सरकारची वैशिष्ट्य असतात. सरकारला अशी आर्थिक पुराणमतवादी भूमिका ठेवायची असली तरी वित्तिय विस्तारासाठी त्यांना पैसा उभा करावाच लागेल. ते आपोआप फ्रीमधे होणार नाही. त्यासाठी श्रीमंतांकडून गरीबांकडे पैशाची देवाणघेवाण होणं फार गरजेचं आहे,’ असं बॅनर्जी पुढे सांगतात.

रोजगाराचा प्रश्नही सुटेल

बहुतेक कॉर्पोरेट कंपन्या या रोख पैशाने भरल्यात. हा पैसा त्यांच्या हातातच अडकून पडलाय. मागणी कमी असल्याने नवीन गुंतवणुकही त्यांना मिळत नाहीय. त्यामुळे पैशाची देवाणघेवाण करण्याची, गरिबांना पैसे वाटण्याची गरज आत्ता त्यांनाही आहे हे आपण समजून घेतलं पाहिजे, असं बॅनर्जी लक्षात आणून देतात.

कंपन्यांना करामधे सूट दिल्याने त्या रोजगार निर्मिती करतील, असा एक सिद्धांत नेहमी मांडला जातो. मागच्या वर्षी जानेवारी महिन्यात यासाठीच कॉर्पोरेट करात कपात करण्यात आली होती. पण यामुळे रोजगाराचा प्रश्न तात्पुरता सुटेल, असं बॅनर्जी यांचं म्हणणं आहे. वस्तूंची जोरदार मागणी वाढली तरच लोक कॉर्पोरेटमधे गुंतवणूक करतील. त्यातून निर्माण झालेला रोजगार हा दीर्घकाळ टिकणारा आणि अर्थव्यवस्थेचा विकास करणारा असेल असं बॅनर्जी म्हणतात. त्यामुळे मध्यम वर्गीय आणि निम्न मध्यम वर्गीय स्तरावरच्या लोकांकडून ही मागणी वाढावी यासाठी प्राधान्य द्यायला हवं. मागणी आणि पुनर्वितरण यासाठी येत्या बजेटमधे श्रीमंत लोक, कॉर्पोरेट सेक्टर यांच्याकडून भरघोस टॅक्स घेणं हाच उपाय असल्याचं बॅनर्जी पुन्हा पुन्हा सांगतायत.

---

## संपादकीय

# अखेर लोकल रुळावर

मुंबईतील जीवनवाहिनी लोकल १ फेब्रुवारीपासून धावल्याने सामान्य प्रवाशांना मोठा दिलासा मिळाला आहे. कोरोना महामारीचे महाभयानक संकट अचानक येऊन धडकल्याने सारेच व्यवहार ठप्प झाले. सुस्साट धावणारी महामुंबई थिजून गेली. गरीब, कष्टकरी, श्रीमंत, उद्योगपती, छोटे–मोठे व्यापारी असे साऱ्यांचेच अतोनात नुकसान होऊन जनजीवन कमालीचे विस्कळीत झाले. शाळा, महाविद्यालयांसह अनेक आस्थापने बंद ठेवावी लागली. त्यातच महामुंबईची जीवन वाहिनी म्हणजे लोकल सेवा गेले सुमारे दहा महिने सामान्यजनांसाठी बंद असून येत्या सोमवारी १ फेब्रुवारी रोजी ही लोकल सेवा सुरू करण्याचा निर्णय राज्यातील महाआघाडी सरकारने शुक्रवारी घेतला आहे. विशेष म्हणजे लोकल सुरू करण्यासाठी सर्व बाजूंनी प्रचंड दबाव आल्यानंतरच राज्य सरकारला अखेर जाग आली असेच म्हणावे लागेल. कारण आरोग्य कर्मचाऱ्यांबरोबरच अत्यावश्यक सेवांचे कर्मचारी अशा अनेकांसाठी लोकल सेवा पाच महिन्यांपूर्वीच सुरू झाली आहे. पण दिवस–रात्र राबणारे कष्टकरी, छोट्या–मोठ्या कारखान्यांत, कार्यालयांमध्ये काम करणारे कामगार–कर्मचारी, बाजारपेठांमध्ये काम करणारे कष्टकरी, हातगाड्या ओढणारे, छोट्या दुकानांमध्ये राबणारे श्रमिक, रस्त्यांच्या कडेला किंवा चौपाट्यांवर पाणीपुरी, भेळपुरी आदी विकणारे फेरीवाले अशा सर्वांसाठीच लोकल प्रवासाची मुभा नाकारून सरकार त्यांच्यावर फार मोठा अन्याय करीत होते हे निश्चित. हातावर पोट असणाऱ्या या असाह्य जनतेचा रोजगाराचा हक्क हिरावून घेऊन त्यांचा जणू जगण्याचा हक्कच नाकारण्याचा नाकर्तेपणा सरकारतर्फे अनेक दिवस सुरू आहे. रेल्वे मंत्रालयाने आपण लोकल सेवा सुरू करण्यास तयार आहोत, असे राज्य सरकारला आधीच कळविले होते व राज्य सरकारकडून लोकल सेवा कशाप्रकारे सुरू केली जावी याबाबतच्या प्रस्तावाची हे प्रशासन वाट पाहत होते. कोरोनाचा धोका सध्या जरी कमी झालेला असला तरी तो पूर्णपणे टळलेला नाही ही महत्त्वाची गोष्ट ध्यानी घेऊन सरकारला लोकल सुरू करण्याचा प्रस्ताव तयार करणे रास्त होते. हे करताना लोकल गाड्यांना होणारी तुफान गर्दी व त्यामुळे कोरोनाचा वाढता धोका या सर्व बाबींचा साकल्याने विचार करून लोकल सेवा सुरू करण्याबाबतचा प्रस्ताव लवकरात लवकर तयार करण्याची आणि कष्टकऱ्यांचा रोजी–रोटी कमावण्याचा मार्ग खुला करण्याची मोठी जबाबदारी सरकारची होती. पण सरकारने या गोष्टीस अक्षम्य विलंब लावला. इतकेच नव्हे तर लोकल सुरू करण्याबाबतच्या तारखांची वेगवेगळ्या नेत्यांकडून घोषणा करून जास्तीत जास्त गोंधळाची स्थिती कशी निर्माण होईल हेच पाहिले गेले आणि ही गोष्ट अत्यंत बेजबाबदारपणाचा कळस गाठणारी अशी आणि राज्यकर्त्यांमधील समन्वयाचा अभाव अधोरेखित करणारी अशीच होती. आता सर्वसामान्यांसाठी लोकल सेवा सुरू केली असली तरी, लोकलमधून प्रवास करण्यासाठी नागरिकांना काही बंधने ही पाळावी लागणार आहेत. ही बंधने म्हणजे नोकरदारांची क्रूर थट्टाच करणारी अशी आहेत. ठाकरे सरकारचा हा निर्णय म्हणजे बैल गेला नी झोपा केला’ अशा स्वरूपाचाच आहे. कारण महामुंबई परिसरात बेस्ट’ची आणि काही ठिकाणी एसटीचीही सेवा, ओला–उबरसारख्या खासगी कंपन्यांसह स्थानिक पातळीवरील रिक्षा–टॅक्सी वाहतूक अगदी भरात आणि जोशात सुरू असताना सर्व चाकरमान्यांना परवडणारी आणि वेळेच्या दृष्टीनेही भावणारी लोकल वाहतूक सुरू करण्याबाबत राज्य सरकारने मोठा वेळकाढूपणा केला. त्यामुळे सर्व थरांतून सरकारवर टीकेचा भडीमार होत होता. आता सामान्यांसाठी लोकल सुरू करण्याचे पत्र सरकारने रेल्वे प्रशासनाला धाडले आहे. पण त्यातील नियम व अटींमुळे प्रवाशांना आनंद वाटण्याऐवजी त्यांच्या चिंतेत भरच पडणार आहे. सर्वसामान्यांना १ फेब्रुवारीपासून लोकल प्रवासाची मुभा देण्यात आली असली तरी लोकल प्रवासासाठी विशिष्ट वेळा ठरविण्यात आल्या आहेत. सर्वसामान्यांना सकाळची पहिली लोकल ते सकाळी ७ वाजेपर्यंत तसेच दुपारी १२ पासून दुपारी ४ वाजेपर्यंत आणि रात्री ९ वाजल्यापासून शेवटच्या लोकलपर्यंत प्रवास करता येणार आहे. प्रशासनाने ठरवून दिलेल्या या वेळांमुळे चाकरमान्यांचे जीवन सुसह्य होण्याऐवजी अधिकच वेदनादायी होणार आहे. कारण कामावर जाण्यासाठी त्यांना फार लवकर उठावे लागेल. तसेच कामाची वेळ उशिरा असेल, तर कामाच्या ठिकाणी खूपच लवकर पोहोचल्याने त्यांचा वेळ मोठ्या प्रमाणात वाया जाऊ शकतो. तीच बाब कामावरून निघताना होणार आहे. कामावरून घरी येण्यास निघाल्यावर लोकल पकडण्यासाठी त्यांना रात्री नऊपर्यंत थांबावे लागेल. जाण्या–येण्याच्या या वेळांमध्ये सर्वसामान्यांबरोबरच अन्य प्रवाशांना मुभा असल्याने सर्वच मार्गावरील लोकल गाड्यांमध्ये मोठ्या प्रमाणात गर्दी होणार हे निश्चित. म्हणजे पिक अवर्स’मधील गर्दी टाळण्यासाठी सरकारने वेळांमध्ये केलेला हा बदल किती तकलादू ठरतो हे दिसेल. भाजपने तर या वेळांना जोरदार आक्षेप घेतला आहे. भाजपचे प्रवीण दरेकर, राम कदम यांनी ट्विट करत ठाकरे सरकारवर जोरदार टीका केली आहे. लोकल ट्रेन पाच महिने उशिरा सुरू करण्याचा महाराष्ट्र सरकारचा निर्णय कमालीचा निष्काळजीपणा दाखवतो. राज्यात मंदिरे, शाळा, महाविद्यालये उघडण्याअगोदर बार उघडण्याची घाई महाविकास आघाडी सरकारने करून आपल्या बेपर्वा वृत्तीचे प्रदर्शन या आधीच घडविले आहे. विशेष म्हणजे पहाटेची पहिली गाडी ते सकाळी सातच्या अगोदर आणि रात्री नऊच्या नंतर या लोकल सेवांची मुभा सामान्यांना दिली असली तरी फायदा कोणाला व कसा होणार? की सरकारला पुन्हा बारवाल्यांचीच चिंता दिसत आहे, असेच म्हणावे लागेल. कारण सरकारने दुकाने रात्री ११ वाजेपर्यंत आणि बार–रेस्टॉरंट्स रात्री १ वाजेपर्यंत खुले ठेवण्यास परवानगी दिली आहे. सर्वसामान्यांना लोकल सेवा उशिरा सुरू करून सरकारने फार मोठा निष्काळजीपणा दाखविला आहे. त्यामुळे लाखो लोकांचे आधीच नुकसान झाले असून दूरवर राहणाऱ्यांच्या नोकऱ्या, रोजगारही गेला आहे. आधीच्या भाजप सरकारचे निर्णय फिरविण्यात, अधिकाऱ्यांच्या बदल्या करण्याच्या कामात मशगुल असलेले हे सरकार सामान्य जनतेच्या प्रति गंभीर नसल्याचेच हे आणखी एक जीवंत उदाहरण म्हणता येईल. कोरोनाच्या पार्श्वभूमीवर सर्व नियम पाळून लोकल सुरू झाली असली तरी प्रवाशांनी शासनाने दिलेले सर्व नियम पाळणे गरजेचे आहे.

---

# ड्रीम व्हिलेज

**ग्रामीण विकास केंद्रस्थानी मानून नगर जिल्ह्यातील राळेगणसिध्दी, हिवरेबाजार आणि औरंगाबाद जिल्ह्यातील पाटोदा ही आपली आदर्श गावे ठरली आहेत. हिवरेबाजार, पाटोदा येथील विकासात्मक संकल्पना अंमलात आणून आपण इतर गावेही अशीच आदर्श करू शकतो, असा आत्मविश्वास देणारा हा विशेष लेख वर्तमानच्या वाचकांसाठी देत आहोत.**





गावात प्रवेश करताच पाहुण्यांचे स्वागत करण्यासाठी प्रवेशद्वार असेल. गावातील सर्व रस्त्याच्या दुतर्फा झाडांनी नटलेल्या व प्रसन्न वातावरण निर्माण करणाऱ्या असतील. गावांतर्गत प्रत्येक रस्ता आरसीसी आणि नाल्या अंडरग्राउंड असतील. प्रत्येक घरासमोर पाणीपुरवठा करण्यासाठी नळ असेल आणि त्या नळाला २४ तास पाणीपुरवठा चालू असेल. गावातील सर्व रस्त्यावर मोठ्या प्रमाणावर एलइडी स्ट्रीट लाईट बसवलेले असतील. गावात २४ तास लाईट उपलब्ध असेल. गावातील कोणीही रोजगार मिळवण्यासाठी बाहेरगावी जाणार नाही तर गावातच रोजगार उपलब्ध असेल. गावातील प्रत्येक शेतात मुबलक पाणी उपलब्ध असेल. मग मोठे सिंचन प्रकल्प किंवा जवळच्या कॅनॉलचे पाणी आणण्यासाठी प्रयत्न केले जातील. प्रत्येक घर नावावर असेल आणि प्रत्येक घराला एकसारखा रंग असेल. त्यामुळे एकसंघपणाची भावना निर्माण होईल. गावात कोणीही बेरोजगार राहणार नाही. प्रत्येकाला क्षमतेनुसार गावातच रोजगार उपलब्ध असेल. कार्यालयीन सर्व कामे गावातच कमी वेळेत आणि कमी खर्चात करून मिळेल. जातीचे प्रमाणपत्र, रेशनकार्ड, रहिवासी प्रमाणपत्र, दिव्यांगाचे, निराधरांचे प्रमाणपत्र अधिकाऱ्यांच्या समन्वयाने गावातच मिळेल. जिल्हा परिषदेची शाळा ८ वीपर्यत असेल आणि गुणवत्तापूर्ण शिक्षण मिळेल. गावात शैक्षणिक वातावरण निर्मिती केली जाईल. गावात व्यायामशाळा, वाचनालय, क्रीडांगण, मंगल कार्यालय, सभागृह, शाळेची दुमजली भव्य इमारत, बगीचा आदी बाबी असतील. त्यामुळे गावाच्या सौंदर्यात भर पडेल. प्रत्येक सार्वजनिक कार्यक्रमात गावातील सर्वजण अनानंदाने सहभागी होतील. सार्वजनिक स्वरूपाचे काम स्वतःचेच आहे असे समजून त्याची काळजी घेण्याची भावना प्रत्येक गावकऱ्यामध्ये निर्माण होईल.

**विकासवार्ता**

**गंगाधर वानोळे**

सर्व विभागाच्या योजना राबविण्यात गाव यशस्वी होईल. गावातील गरिबी नाहीशी होऊन गावाची वाटचाल प्रगतीकडे होईल. गावातील प्रत्येक काम उत्कृष्ट होईल आणि सर्वजण त्या कामाकडे लक्ष देतील. महिन्यात झालेला खर्च ग्रामपंचायत कार्यालयाच्या नोटीस बोर्डवर लावलेला असेल. पारदर्शक कारभार केल्याने विश्वासार्हता वाढून लोकसहभाग मिळेल. त्यामळे शासनाच्या प्रत्येक योजनेत गाव सहभागी होईल त्यामुळे गावात एकोप्याचे वातावरण निर्माण होईल आणि गावाला अनेक पुरस्कार मिळून गावचे नाव जिल्ह्यासह राज्यात आदरणारे घेतले जाईल.



---

# शेतकऱ्यांच्या आत्महत्या थांबाव्यात म्हणून...

१९ मार्च रोजी आपण सगळे शेतकरी सहवेदनेसाठी एक दिवसाचा उपवास करू

१९ मार्च का?

१९ मार्च १९८६ रोजी चिलगव्हाण (ता.महागाव, जि. यवतमाळ) येथील शेतकरी साहेबराव करपे पाटील यांनी पत्नी व चार मुलांसह आत्महत्या केली होती. ही शेतकर्याची पहिली सामूहिक आत्महत्या मानली जाते. २०१७ पासून महाराष्ट्रातीलच नव्हे, देशातील व विदेशातील लाखो सुहृदयी लोक दरवर्षी १९ मार्चला उपवास करतात.

सहवेदना

अन्न हा जीवाचा मूलाधार आहे. अन्न निर्माण करता आले म्हणून माणूस प्रगती करू शकला. शेतकरी अन्न पिकवतो. तो सर्जक आहे. त्याच्या आत्महत्या ही गंभीर बाब आहे. खरे तर शेतकरी आत्महत्या ही राष्ट्रीय आपत्ती मानली पाहिजे. दुर्दैवाने या गंभीर बाबीकडे कोणाचे फारसे लक्ष नाही.

शेतकरी आत्महत्या थांबाव्यात या साठी मी काय करू शकतो? आपण सामान्य माणसे आहोत. आपल्या हातात सत्ता नाही. शेतकरीविरोधी (सीलिंग, आवश्यक वस्तू आदी) नरभक्षी कायदे रद्द करण्याचा अधिकार नाही.

आपण शस्त्र घेऊन लढू शकत नाही. करोडो शेतकाऱ्याना आर्थिक मदत देण्याऐवढी पुंजीही आपल्या जवळ नाही. आपण सामान्य माणसे, सहवेदना व्यक्त करू शकतो. शेतकाऱ्याना ’आम्ही तुमच्या पाठीशी आहोत’ हा दिलासा देऊ शकतो. तो दिलासा देण्यासाठी व सहवेदना व्यक्त करण्यासाठी १९ मार्च रोजी आपल्याला उपवास करायचा आहे. आत्मक्लेशाचा हा मार्ग या देशात अनेकदा वापरला गेला आहे. त्यातून अपेक्षित परिणाम आले आहेत. तोच प्रयत्न आपण करायचा आहे!

**प्रासंगिक**

**अमर हबीब**

उपवास आणि उपोषण

हा उपवास उत्स्फूर्तपणे, आपल्या मनाशी निर्धार करून करायचा आहे. आपण आपले नित्याचे काम करीत उपवास करु शकतो. खूप केले देवा–नवसाची उपवास, आता एक उपवास शेतकऱ्यांसाठी! याला आपण वैयक्तिक उपवास म्हणू.

सार्वजनिक ठिकाणी बसणे, म्हणजे उपोषण करणे, तुम्हाला जे सोयीचे वाटेल त्या पद्धतीने उपवास किंवा उपोषण करू शकता.

अन्नत्याग का?

१) साहेबराव करपे कुटुंबीय व आत्महत्या केलेल्या तमाम शेतकऱ्यांचे स्मरण करणे. त्यांना श्रद्धांजली अर्पण करणे.

२) शेतकऱ्यांविषयी सहवेदना व्यक्त करणे.

३) शेतकऱ्यांप्रती आपली बांधीलकी बळकट करणे.

४) शेतकऱ्यांच्या आत्महत्यांसाठी कारणीभूत असलेल्या कारणांचा विचार करून विरोध करणे.

५) शेतकरी स्वातंत्र्यासाठी संकल्प करणे.

(क्रमशः)

# केंद्र सरकार शेतकरी, कष्टकरी विरोधी

## लोकशाहीर संभाजी भगत यांचा घणाघात; रमाई जन्मोत्सव उत्साहात

▶ प्रतिनिधी

माजलगाव : देशातील सत्तारूढ मोदी सरकार शेतकरी, कष्टकरी विरोधी असून गोरगरीब विरोधी आणि गर्भश्रीमंत धार्जिणे असल्याचा घणाघाती आरोप विद्रोही शाहीर संभाजी भगत यांनी माजलगाव येथे केला. ते रमाई जन्मोत्सव सोहळ्यात रविवारी बोलत होते.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजलगावचे नगराध्यक्ष शेख मंजूर हे तर उद्घाटक म्हणून आमदार प्रकाश सोळंके होते. प्रमुख पाहुणे म्हणून कचरू खळगे, शिवाजी रांजवण, श्रीहरी मोरे, मुरलीधर साळवे, विलास नेमाणे, नवनाथ धाईजे, मिलिंद लगाडे, ॲड.अमोल डोंगरे, शेख नजीर, राम भोले, स्वागताध्यक्ष माजी नगरसेवक राजेश साळवे यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाची सुरूवात माता रमाई आंबेडकर, राष्ट्रमाता जिजाऊ माँसाहेब, सावित्रामाई फुले, अहिल्याबाई होळकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमाची सुरूवात करण्यात आली. पुढे बोलतांना संभाजी भगत म्हणाले, हम गाणे वाले नहीं हैं...हम विचार गाणे वाले हैं....हम बाबासाहब के भगत है असे म्हणत मी बाबासाहेबांच्या विचाराने श्रीमंत आहे. मी कार्यक्रमास पैसे घेत नाही. मला कुणीही पैसे देण्याचा प्रयत्न करू नये. मी समाजजागृतीसाठी फुले, शाहु, आंबेडकरांचे विचार रूजविण्याचे काम करत आहे असे सांगून देशातील मोदी सरकारवर व समाजातील रूढी, परंपरेवर शाहिरीतुन त्यांनी टिकेची झोड उठविली. देशात सध्या अस्तित्वात असलेले मोदी सरकार हे शेतकरी, कष्टकरी, सर्वसामान्यांच्या हिताचे निर्णय राबविण्याऐवजी विरोधात आहेत.

याउलट अंबानी, आदानी या उद्योजकांसाठीच हे सरकार काम करत असल्याचा आरोप करत देशातील लोकशाही आणि संविधान हे धोक्यात आले असल्याचे मत विद्रोही लोकशाहीर संभाजी भगत यांनी व्यक्त केले, तर देशातील मोदी सरकार हे खाजगीकरणाचे धोरण स्विकारत असून हे सरकार शेतकरी, कष्टकरी, बहुजन समाजाच्या विरोधात असल्याने हे मोदी सरकार गेल्याशिवाय बहुजनांचा विकास होणार नाही असे मत आमदार प्रकाश सोळंके यांनी व्यक्त केले. माजलगाव शहरातील जुना मोंढातील मदानावर रमाई जन्मोत्सव सोहळा रविवार, दि.७ फेब्रुवारी आयोजित करण्यात आला होता.



**जि.प.सदस्य चंद्रकांत शेजुळ यांचा सहकार भूषण पुरस्कार सन्मानित करताना लोकशाहीर संभाजी भगत, आमदार प्रकाश सोळंके, बाबुराव पोटभरे, तुकाराम येवले व मान्यवर आदी.**

यावेळी रमाई जन्मोत्सव समितीच्या वतीने बहुजन विकास मोर्चाचे संस्थापक अध्यक्ष बाबुराव पोटभरे यांना समाजभूषण, जि.प.सदस्य चंद्रकांत शेजुळ यांना सहकार भूषण तर पत्रकार संघाचे जिल्हाध्यक्ष तुकाराम येवले यांना दर्पण असे पुरस्कार देऊन मान्यवरांच्या हस्ते गौरविण्यात आले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक राष्ट्रवादीचे नेते कचरू खळगे यांनी केले. सूत्रसंचालन डोंगरे, राम भोले यांनी तर आभार स्वागताध्यक्ष राजेश साळवे यांनी मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी जयंती अध्यक्ष राजरत्न खळगे, उपाध्यक्ष अक्षय साळवे, सचिन वैद्य, सारंग स्वामी, अनिल भालेराव, रंजित ससाणे, संकेत खळगे, चंद्रमणी डोंगरे, विजय पौळ, सदानंद प्रधान, बाबासाहेब साळवे यांनी परिश्रम घेतले.

# घरकुल योजनेच्या दुसऱ्या हप्त्याचे होणार वाटप

## नगराध्यक्ष शेख मंजूर यांची माहिती

▶ प्रतिनिधी

माजलगाव : माजलगाव नगर परिषद अंतर्गत प्रधानमंत्री आवास योजनेतील पात्र १४९ लाभार्थ्यांना दुसऱ्या हप्त्याचे ९० लाख रूपयांचे वाटप आमदार प्रकाश सोळंके यांच्या शुभ हस्ते लाभार्थ्यांनी आपल्या निधीचे प्रमाणपत्र वाटप करण्यात येणार असल्याची माहिती नगराध्यक्ष शेख मंजूर यांनी दिली.



शहरातील पंतप्रधान आवास योजनेतील लाभार्थी अनुदानासाठी गेल्या कित्येक महिन्यांपासून खेटे घालून परेशान झाले होते. परंतु मी नगराध्यक्ष पदाचा कार्यभार घेतल्यानंतर या लाभार्थ्यांनसाठी जिल्हाधिकारी साहेबान कडे पाठपुरावा करून शासनाच्या सुचना व अटीच्या अधिन राहून १४९ पात्र लाभार्थ्यांना प्रत्येकी ६०, ००० रूपये असे एकूण ९० लाख रूपयाच्या निधीचे प्रमाणपत्राचे वाटप आमदार प्रकाश सोळंके यांच्या शुभहस्ते छत्रपती विद्यालय, धारूर रोड माजलगाव येथे करण्यात येणार, तरी सर्व पात्र लाभार्थ्यांनी आपले पत्र स्विकारण्यासाठी या कार्येक्रमास उपस्थित रहावे असे आवाहन नगराध्यक्ष शेख मंजूर यांनी केले आहे. हा निधी प्राप्त झाल्याने माजलगावातील घरकुलधारकांना मोठा दिलासा मिळणार आहे.

# माजलगावातील तीन ग्रामसेवक 'आदर्श'







माजलगाव : बीड जिल्हा परिषद अंतर्गत दिले जाणारे आदर्श ग्रामसेवक पुरस्कार जाहीर झाले आहेत. पंचायत समिती माजलगाव येथील सन २०१५ साठी दिलीप साधुजी खरात, सन २०१६ साठी संतोष पोपटराव हजारे व सन २०१७ साठी महेश राजाराम गेंदले यांची निवड आदर्श ग्रामसेवक म्हणून जाहीर करण्यात आली आहे.यांच्या निवडीबद्दल माजलगाव पंचायत समितीच्या गटविकास अधिकारी श्रीमती प्रज्ञा माने-भोसले, रामचंद्र रोडेवाड, राजेंद्र पारटकर, कातकडे, माजलगाव ग्रामसेवक तालुका संघटनेचे अध्यक्ष रामकृष्ण यादव, उपाध्यक्ष आर.व्ही.झगडे व इतर पदाधिकारी, यांनी अभिनंदन केले.

# माजलगावात वाहन तपासणी मोहीम

## जी.पी.एस.बसवून घ्या : पोलीस निरीक्षक धनंजय फराटे

▶ प्रतिनिधी

माजलगाव : मोटरसायकल चोरीचे प्रमाण रोखण्यासाठी व चोरीस गेलेल्या मोटरसायकलच्या तपास कामासाठी शहर पोलीस ठाण्याच्या वतीने मोटर सायकल व वाहन तपासणी मोहीम दि.८ फेब्रुवारी २०२१ सोमवार पासून राबवण्यात येत आहे. तेव्हा मोटर सायकल व वाहन मालकांनी आप आपल्या वाहनांची कागदपत्रे सोबत ठेवावीत व नवीन बी.एस.६ मोटरसायकल खरेदी केलेल्या आहेत त्यांनी आपल्या मोटारसायकलला सुरक्षिततेच्या दृष्टीने जीपीएस बसून घ्यावे असे आवाहन शहर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक धनंजय फराटे यांनी केले आहे.



सध्या स्पर्धेच्या युगामध्ये दळणवळणासाठी वाहनांची संख्या मोटरसायकलची संख्या दिवसेंदिवस झपाट्याने वाढत आहे. परंतु अशा परिस्थितीमध्ये गेल्या काही दिवसांपासून जिल्ह्यात मोटरसायकल चोरीचे प्रमाण वाढल्याचे दिसून येत आहे.

या मोटर सायकल चोरीला आळा घालण्यासाठी व चोरीस गेलेल्या मोटरसायकलचा तपास करण्यासाठी जिल्हा पोलीस अधीक्षक, उपविभागीय पोलिस अधिकारी माजलगाव, यांच्या मार्गदर्शनाखाली माजलगाव शहर पोलीस ठाण्याच्या वतीने वाहन तपासणी व मोटारसायकल तपासणी मोहीम दि.८ फेब्रुवारी २०२१ पासून राबविण्यात येत आहे. तेव्हा या मोहिमेत पोलिसांना वाहनधारकांनी व मोटरसायकल मालकांनी आपआपल्या वाहनांची सर्व कागदपत्रे सोबत ठेवावीत किंवा तपासासाठी आणून दाखवावीत त्याचबरोबर नवीन निघालेल्या बीएससीच्या मोटरसायकलच्या किंमती लाखो रूपये झाल्या आहेत तेव्हा सर्व नवीन मोटरसायकल धारकांनी आपापल्या मोटरसायकलला जी.पी.एस.बसून घ्यावे.

जेणेकरून आपल्या गाडीची सुरक्षितता होईल व गाड्या चोरी जाण्यास आळा बसेल म्हणून शहर पोलीस हा उपक्रम राबवित आहेत. ते जनतेच्या हितासाठी आहेत तेव्हा सर्व वाहनचालक, मालकांनी माजलगाव पोलिसांच्या तपासणी मोहिमेला जनतेने सहकार्य करावे असे आवाहन माजलगाव शहर पोलिस स्टेशनचे पोलीस निरीक्षक धनंजय फराटे यांनी केले आहे.

# दिल्ली येथील शेतकरी आंदोलनाला पाठींबा

## मोठेवाडी फाट्यावर शेकाप, माकपचा रास्ता रोको

▶ प्रतिनिधी

माजलगाव : दिल्ली येथे सुरू असलेल्या शेतकरी आंदोलनाला पाठिंबा देण्यासाठी शेतकरी कामगार पक्ष, मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाच्यावतीने शनिवारी तालुक्यातील मोठीवाडी फाटा येथे तब्बल दीड तास रास्ता रोको आंदोलन करण्यात आले.

यावेळी शेतकरी कामगार पक्षाचे नेते भाई ॲड.नारायण गोले पाटील, माकपचे मुसद्दिक बाबा, शेख याकूब यांच्यासह राष्ट्रवादी, शिवसेना, संभाजी ब्रिगेड आदींचे नेते, या सर्व पक्षांचे कार्यकर्ते, शेतकरी बहुसंख्येने उपस्थित होते. केंद्र सरकारने शेतकरी विरोधी कायदे परत घ्यावेत अन्यथा आंदोलन तीव्र करण्याचा इशारा शेकापचे नेते भाई ॲड.नारायण गोले पाटील यांनी दिला. आंदोलनासाठी पप्पू हिवरकर, कुंडलिक खेत्री, संभाजी चव्हाण, संभाजी पास्टे, पांडुरंग गोंडे, आनंद यादव, ज्ञानेश्वर खेत्री विद्यासागर खेत्री, ज्ञानेश्वर चव्हाण, भगवान रोकडे, तुकाराम खेत्रे, कडाजी नावडकर, अशोक गायकवाड, जगन खेत्री, वैजनाथ कटके, धैर्यशील गोंडे, नितीन जाधव, विलास जाधव यांनी परिश्रम घेतले.

## पांडुरंग मते यांना पितृशोक

▶ प्रतिनिधी

माजलगाव : तालुक्यातील फुलपिंपळगावचे सरपंच पांडुरंग मते यांचे वडील प्रल्हादराव सटवाजी मते (वय ८७ वर्ष) यांचे वृध्दापकाळाने दि.१० फेब्रुवारी रोजी दुपारी १२ वाजता निधन झाले. यांच्या पश्चात पाच मुले, तीन मुली, सुना, नातवंडे असा परिवार आहे. मते यांच्या दुःखात वर्तमान परिवार सहभागी आहे.



## 'मृदुंगमहर्षी'चा गौरव



माजलगाव : भारतरत्न पंडित भीमसेन जोशी शास्त्रीय संगीत जीवनगौरव पुरस्कार निवड समितीच्या सदस्यपदी निवड झाल्याबद्दल जगविख्यात पखवाज वादक पंडित उध्दवबापू आपेगावकर यांचा वर्तमान कार्यालयात गौरव करताना बालासाहेब फपाळ पाटील, गणेशराव शिंदे, वर्तमान माध्यम समुहाचे मुख्य संपादक भगीरथ तोडकरी, दीपक तोडकरी.

# माजलगाव शहराच्या विकासासाठी कटिबद्ध

## आमदार प्रकाश सोळंके यांचे प्रतिपादन; पाच कोटींच्या ३८ रस्त्यांच्या कामांचा शुभारंभ

▶ प्रतिनिधी

माजलगाव : नगरपरिषदेच्या माध्यमातून विकासाचा अजेंडा कायम ठेवत आतापर्यंत प्रलंबित असलेली विकासकामे गतीने करण्यात येणार आहेत. मार्च अखेर पूर्ण विकास निधी खर्च होणार असून माजलगाव शहराच्या विकासासाठी कटिबद्ध असल्याचे प्रतिपादन आमदार प्रकाश सोळंके यांनी केले.

माजलगाव नगर परिषदेंतर्गत वैशिष्ट्यपूर्ण विशेष अनुदान ३८ रस्त्यांच्या कामाचा शुभारंभ रविवारी सकाळी आमदार प्रकाश सोळंके यांच्या हस्ते झाला. अध्यक्षस्थानी माजी आमदार डी.के. देशमुख हे होते तर प्रमुख पाहुणे म्हणून बहुजन विकास मोर्चाचे संस्थापक बाबुराव पोटभरे, अच्युतराव लाटे, जि.प.सदस्य चंद्रकांत शेजुळ, सभापती संभाजी शेजुळ, नगराध्यक्ष शेख मंजूर यांच्यासह मान्यवरांची उपस्थिती होती. नगराध्यक्ष शेख मंजूर यांनी विकास कामांस सुरुवात करून रस्त्यांचे कामे सुरू केली आहेत. ३८ रस्त्यांची कामे दर्जेदार करून घ्यावीत व या कामावरही जनतेने लक्ष द्यावे असेही आमदार प्रकाश सोळंके यांनी सांगितले. यावेळी बाबुराव पोटभरे, अच्युतराव लाटे यांची भाषणे झाली.



**माजलगाव : येथे कार्यक्रमात बोलतांना आमदार प्रकाश सोळंके, व्यासपीठावर माजी आमदार डी.के.देशमुख, बाबुराव पोटभरे, नगराध्यक्ष मंजूर शेख आदी.**

# संजय गांधी निराधार समितीच्या अध्यक्षपदी दिपकराव थावरे

▶ प्रतिनिधी

माजलगाव : माजलगाव तालुका संजय गांधी निराधार समिती गठीत करण्यात आली असून अध्यक्षपदी दिपकराव थावरे यांची निवड करण्यात आली. पालकमंत्री धनंजय मुंडे यांनी दि.२७ जानेवारी २०२१ रोजी माजलगाव तालुका संजय गांधी निराधार समिती गठीत केली असून या समितीमध्ये अध्यक्षपदी राष्ट्रवादीचे दिपकराव थावरे यांची निवड केली आहे.



हे तर सदस्य म्हणून शिवसेनेच्या वतीने लताताई सुनिलराव खंडागळे, रामराजे शिवाजी सोळंके, तर काँग्रेसच्या वतीने दत्ता लक्ष्मण कांबळे, राष्ट्रवादीचे नामदेव सरवदे ,बळीराम कारके शेतकरी संघटनेचे प्रतिनिधी अशोक नामदेवराव नरवडे, अपंगाचे प्रतिनिधी श्रीनिवास आदमाने, शासन नोंदणीकृत प्रतिनिधी म्हणून हरिभाऊ गरड, ज्येष्ठ नागरिक प्रतिनिधी म्हणून कलंदर अजिज खान पठाण यांची सदस्य म्हणून निवड करण्यात आली आहे.

# उपेक्षित समाज संघटनेच्या मागणीला यश

## निराधार योजनेचे प्रलंबित अर्ज निकाली काढण्याची प्रक्रिया सुरू

▶ प्रतिनिधी

माजलगाव : मागील आठ ते नउ महिण्यांपासुन तहसिल कार्यालयात निराधार योजनेचे अर्ज प्रलंबीत होते. याप्रकरणी उपेक्षित समाज संघटनेच्या वतीने हे अर्ज तात्काळ निकाली काढावीत अन्यथा आंदोलन करण्याचा इशारा देण्यात आला होता. याची दखल घेत तहसिल प्रशासनाने दि.०५ फेब्रुवारीला मंजुर प्रकरणाची यादी प्रसिध्द केली आहे.

मागील नऊ महिण्यांपासुन तहसिल कार्यालयात संजय गांधी निराधार योजना, श्रावण बाळ योजनेचे अर्ज प्रलंबीत होते. त्यावर कोणतीही कारवाई होत नव्हती. याप्रकरणी प्रलंबीत अर्ज निकाली काढावेत, संपुर्ण योजनेतील मंजूर लाभार्थ्यांची यादी सूचना फलकांवर लावावी अन्यथा उपोषण करण्याचा इशारा उपेक्षित समाज संघटनेचे अध्यक्ष ॲड.गौतम मिसाळ, सचिव ॲड.बी.एस.नाडे यांनी दिला होता. यावर तहसिल प्रशासनाने दखल घेत प्रलंबीत प्रकरणे निकाली काढण्याची प्रक्रिया सुरू केली असून सुचना फलकांवर मंजुर लाभार्थ्यांची यादी देखिल लावण्यात आली आहे.

# तलाठी रूपचंद आभारे यांचा गौरव

▶ प्रतिनिधी

माजलगाव : तालुक्यातील सोन्नाथडी सज्जाचे तलाठी रूपचंद आभारे यांनी ई-पीक पाहणी नोंदणी या शासनाच्या महत्वाकांक्षी प्रकल्पात बीड जिल्ह्यात उत्कृष्ट काम केल्याबद्दल येथील उपविभागीय अधिकारी श्रीकांत गायकवाड, तहसीलदार वैशाली पाटील यांच्या हस्ते त्यांना प्रशस्तीपत्र देऊन गौरविण्यात आले.



महाराष्ट्र शासनाने शेतकऱ्यांना ई-पीक पाहणी ॲप नोंदणी प्रकल्प २०२१च्या साहाय्याने जोडण्याचा प्रयत्न केला आहे. या ॲपद्वारे शेतकऱ्यांना शासनाच्या विविध योजनांची माहिती घर बसल्या मिळणार आहे. यासाठी गावातील तलाठ्यांच्या मदतीने प्रत्यक्ष शेतात जाऊन आपल्या आधुनिक मोबाईल द्वारे हे ई-पीक ॲप डाऊनलोड करून याचे गावागावात प्रशिक्षण देण्याचे काम सुरू आहे याचा एक भाग म्हणून तालुक्यातील उत्कृष्ट तलाठी म्हणून सर्वांना परिचित असलेले सोन्नाथडी येथील तलाठी रूपचंद आभारे यांनी हे गाव शंभर टक्के संपूर्ण ई-पीक ॲपचे प्रशिक्षण देऊन या ॲपला जोडून जिल्ह्यात प्रथम आणले आहे. त्यांच्या या कामाची दखल येथील उपविभागीय अधिकारी श्रीकांत गायकवाड व तहसीलदार वैशाली पाटील यांनी घेऊन दि.१ फेब्रुवारी रोजी तहसील येथील एका समारंभाच्या कार्यक्रमात तलाठी रुपचंद सुधाकर आभारे यांना प्रशस्तीपत्र देऊन गौरविण्यात आले व त्यांच्या पुढील कार्यास शुभेच्छा देण्यात आल्या.सन्मान झाल्याने आणखी जबाबदारी वाढली असून काम केल्याचे समाधान वाटत आहे. हे यश माझे वैयक्तिक नसून मला गावातील मनापासून सहकार्य करणाऱ्या माझ्या सर्व तरुण मित्रांचे व शेतकरी बांधवांचे आहे अशी प्रतिक्रिया आभारे यांनी दिली.

# राष्ट्रवादी महिला आघाडीकडून गॅस दरवाढीचा निषेध

▶ प्रतिनिधी

माजलगाव : येथील राष्ट्रवादी महिला काँग्रेसच्या तालुकाध्यक्ष संध्या भांडेकर, नसरीन शेख यांच्या नेतृत्वाखाली गोवऱ्यांवर स्वयंपाक करून गॅस दरवाढीचा निषेध करण्यात आला.

दिवसेंदिवस गॅसच्या दरवाढीमुळे सर्वसामान्य नागरिक व गृहिणी त्रस्त झाले झाल्याने केंद्र सरकारच्या विरोधात असंतोष पसरला आहे. याकडे सरकारचे लक्ष वेधण्यासाठी यापूर्वीच राष्ट्रवादी महिला काँग्रेसच्या वतीने 'चूल पेटवा' आंदोलन करून केंद्र सरकारचे लक्ष वेधले होते. पण केंद्राच्या वतीने त्याची दखल घेतली नसल्यामुळे महिला वर्गात प्रचंड नाराजी आहे. सर्वसामान्यांना महागाईने मोठी झळ बसत आहे. गॅसच्या किंमतीत मोठी वाढ झाली त्यामुळे सर्वसामान्य या महागाई भरडला जात आहे.



# रेल्वे मार्गासाठी ५२७ कोटींची तरतूद

## खासदार डॉ.प्रितम मुंडे यांच्या प्रयत्नांना यश

▶ प्रतिनिधी

बीड : जिल्ह्याच्या जिव्हाळ्याच्या विषय असलेल्या नगर-बीड-परळी रेल्वे मार्गासाठी केंद्र सरकारने वार्षिक अर्थसंकल्पात ५२७ कोटी ६३ लाख ८८ हजार रुपयांची तरतूद केली आहे. रेल्वे मार्गासाठी हा निधी मंजूर केल्यामुळे प्रकल्पाच्या कामाला गती मिळणार आहे.यासंदर्भात खासदार डॉ.प्रितम मुंडे यांनी केंद्रीय रेल्वेमंत्री पियुष गोयल यांची भेट घेऊन आभार मानले आहेत. त्यांनी केलेल्या सततच्या पाठपुराव्यामुळे यंदाच्या अर्थसंकल्पात निधीची रेल्वेमार्गाच्या कामासाठी भरीव तरतूद करण्यात आली आहे.

केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सितारामन यांनी नुकताच देशाचा वार्षिक अर्थसंकल्प मांडला. केंद्र सरकारच्या अर्थसंकल्पात देशातील प्रलंबित प्रकल्पांना गती देण्यासाठी मोठ्या प्रमाणात निधीची तरतूद करण्यात आली आहे. बीड जिल्ह्याच्या दृष्टीने अतिशय महत्वपूर्ण असलेल्या नगर-बीड-परळी रेल्वे मार्गासाठी या अर्थसंकल्पात ५२७ कोटी ६३ लाख ८८ हजार रुपये मंजूर करण्यात आले आहेत. रेल्वे मार्गाच्या कामाला निधीची कमतरता भासू नये व प्रकल्प वेळेत पूर्ण व्हावा यासाठी खासदार डॉ.प्रितम मुंडे यांनी वेळोवेळी पाठपुरावा केला, त्यांनी केलेल्या यशस्वी पाठपुराव्यामुळे रेल्वे मार्गासाठी केंद्र सरकारने पाचशे सत्तावीस कोटी रुपयांचा भरीव निधी मंजूर केला आहे.

केंद्र व राज्य सरकारने या रेल्वे प्रकल्पासाठी समान निधी देणे अपेक्षित आहे. भाजपच्या राष्ट्रीय सचिव पंकजा मुंडे जिल्ह्याच्या पालकमंत्री असताना त्यांनी राज्याच्या वाट्याचा निधी उपलब्ध करून दिला, पंकजा मुंडेंच्या पाठपुराव्याने राज्य सरकारचा निधी मिळत राहिल्याने रेल्वे



मार्गाच्या कामाला गती मिळाली होती. परंतु राज्यात महाविकास आघाडीचे सरकार आले आणि दोन वर्षाच्या काळात राज्याकडून रेल्वेच्या कामासाठी निधीच मिळाला नाही. परिणामी रेल्वे प्रकल्पाच्या कामात अडथळे आणि दिरंगाई आली.सध्या नगर-बीड-परळी रेल्वे मार्गासाठी खासदार डॉ.प्रितम मुंडे यांच्या तळमळीने केवळ केंद्र सरकारचा निधी मिळत आहे. त्यांच्या पाठपुराव्याने एकूण अठ्ठाविसशे कोटींपैकी केंद्राच्या वाट्याचा असलेला अर्धा निधी जवळपास उपलब्ध झाला आहे. प्रकल्प वेळेत पूर्ण करण्यासाठी राज्य सरकारने त्यांच्या वाट्याचा निधी देणे आवश्यक आहे. दरम्यान केंद्र सरकारने दिलेला निधी आणि खासदार डॉ.प्रितम मुंडे यांनी केलेला पाठपुरावा रेल्वेच्या कामाला गती देणारा असल्यामुळे जिल्ह्यातील नागरीकांमधून त्यांचे आभार व्यक्त केले जात आहेत.

# शेकापचा आता बैलगाडी मोर्चा

## अस्मानी, सुलतानी संकटाचा सामना करण्यासाठी पुढे या : भाई ॲड.नारायण गोले पाटील

▶ प्रतिनिधी

माजलगाव : शेतकरी कधी अस्मानी तर कधी सुलतानी संकटांचा सामना करत, हाल-अपेष्टा सहन करत कसाबसा आपल्या मुला बाळांच्या संसाराचा गाडा चालवत असताना, केंद्र शासनाने शेतकऱ्याला देशोधडीला लावण्याचा, शेतकऱ्याची शेती भांडवल दारांच्या घशात घालण्याचा कट शेतकरीविरोधी तीन कायदे करून रचला असल्याने हरियाणा, पंजाब सह देशभरातील विविध राज्यातून कोट्यावधी शेतकरी बांधव दिल्लीत जवळजवळ गेल्या अडीच महिन्यांपासून तळ ठोकून शांततेच्या मार्गाने, केंद्र शासनाने केलेल्या शेतकरीविरोधी कायद्याच्या विरोधात आंदोलन करत असताना देशाचे पंतप्रधान आंदोलनकर्त्यांच्या मागण्या मंजूर करायला तयार नाहीत.



शेतकऱ्यांना वाचवण्यासाठी स्वामीनाथन आयोगाच्या शिफारसी शासनाने लागू करणे आवश्यक आहे, परंतु गेंड्याची कातडी पांघरलेल्या शासनाला शेतकरी आंदोलनाची हाक ऐकू येत नाही.शेतकऱ्यांच्या विविध मागण्या पदरात पाडून घेतल्या पाहिजेत यासाठी दिनांक १२ फेब्रुवारी २०२१रोजी दुपारी १२वाजता जिल्हाधिकारी कार्यालय बीड येथे भारतीय शेतकरी कामगार पक्षाच्या वतीने भाई मोहन गुंड पाटील यांच्या नेतृत्वाखाली भव्य बैलगाडी मोर्चाचे आयोजन करण्यात आले आहे तरी शेतकरी बांधवांनी शेकडो बैलगाड्या घेऊन हजारोच्या संख्येने उपस्थित रहावे, असे आवाहन शेतकरी कामगार पक्षाचे नेते भाई ॲड.नारायण गोले पाटील यांनी केले आहे.

# दिंद्रुड ग्रामपंचायतीला मिळाला उच्चशिक्षित तरूण 'कारभारी'

## सरपंचपदासाठी अजय कोमटवार यांच्या नावावर शिक्कामोर्तब

▶ प्रतिनिधी

माजलगाव : दिंद्रुड ग्रामपंचायतला अनुसूचित जमातीसाठी सरपंच पद राखीव आहे. नुकत्याच झालेल्या ग्रामपंचायत निवडणुकीत केवळ अजय कोमटवार व त्यांचा पॅनल बहुमताने विजयी झाल्याने सरपंच पदासाठी अजय दिलीपराव कोमटवार यांच्या नावाने शिक्कामोर्तब झाले असून दिंद्रुडला उच्चशिक्षित सरपंच मिळत आहे.



पंधरा ग्रामपंचायत सदस्य संख्या असलेल्या दिंद्रुड ग्रामपंचायत निवडणुकीत येथील माजी सरपंच दिलीप कोमटवार यांच्या नेतृत्वाखाली ११ उमेदवार तर जनसेवा ग्रामविकास आघाडीचे ४ उमेदवार विजयी झाले आहेत. सरपंच पदासाठी अनुसूचित जमाती प्रवर्गासाठी राखीव असल्याने या प्रवर्गात विजयी झालेले अजय कोमटवार हेच सरपंच होणार असल्याचे शिक्कामोर्तब झाले आहे. अजय दिलीपराव कोमटवार हे ३१ वर्षीय युवा सरपंचपदी विराजमान होत आहेत. एम.सी.ए.ची पदवी प्राप्त उच्च शिक्षित तरुण नेतृत्व गावाचा चेहरामोहरा आधुनिक करण्यासाठी दिंद्रुडच्या सेवेत पुढील पाच वर्षे काम करणार आहेत.

# चंद्रकांत शेजुळ यांच्या वाढदिवसानिमित्त शालेय साहित्य वाटप

## तुळजाभवानी इंजिनिअर ॲण्ड कॉन्ट्रॅक्टर्सचा गंगामसला येथे उपक्रम

▶ प्रतिनिधी

माजलगाव : बीड जिल्हा परिषदेचे सदस्य, जिल्हा मध्यवर्ती बँकेचे संचालक तथा तुळजाभवानी अर्बन मल्टीस्टेटचे संस्थापक अध्यक्ष चंद्रकांत शेजुळ यांच्या वाढदिवसानिमित्त गंगामसला येथे शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले. दरम्यान, तुळजाभवानी इंजिनिअर ॲण्ड कॉन्ट्रॅक्टर्सच्या वतीने हा सामाजिक उपक्रम राबविण्यात आला असल्याची माहिती संयोजक तेजसिंह विजयसिंह सोळंके यांनी दिली.

तालुक्यातील गंगामसला येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा वसाहत, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा (मुलांची) आणि जिल्हा परिषद कन्या प्रशाला येथे



शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले. या सामाजिक क्षेत्रात जिल्हा परिषद सदस्य तथा तुळजाभवानी अर्बन मल्टीस्टेटचे संस्थापक अध्यक्ष चंद्रकांत शेजुळ यांचा वाढदिवस विविध सामाजिक उपक्रमांनी साजरा करण्यात आला. त्याचाच एक भाग म्हणून गंगामसला येथे तुळजाभवानी इंजिनिअर ॲण्ड कॉन्ट्रॅक्टर्सचे तेजसिंह विजयसिंह सोळंके यांच्या वतीने विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले. याप्रसंगी सरपंच धम्मशाला गवळी, सत्यभान गवळी, माऊली गवळी, जयसिंग सोळंके, सय्यद आदी उपस्थित होते.


पाचव्या वाढदिवसाच्या

**हार्दिक शुभेच्छा!**



**समिक्षा सुनिल सौंदरमल**

************

शुभेच्छुक : : अदिती, बाबासाहेब, रागिणी, ज्ञानेश्वर, कपिल, सनी, सुमित, संकेत, दिव्या, दिया.





आधुनिक विचारांचे वर्तमान

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक आणि **संपादक : भगीरथ गौरीशंकर तोडकरी,** यांनी तुळजा भवानी पब्लिकेशन,माजलगाव ता.माजलगाव जि. बीड 431131 (महाराष्ट्र) येथे छापून आधुनिक विचारांचे वर्तमान कार्यालय,23, मुख्य रस्ता, मस्जिद चौक, माजलगाव ता.माजलगाव जि.बीड येथे प्रसिद्ध केले. ईमेल : vartmaneditor@gmail.com भ्रमणध्वनी : **9423209823** RNI : MAHMAR/2018/76928, अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या, लेख, व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (सर्व वाद माजलगाव न्यायालय अंतर्गत) Postal REG No : L/92/RNP/Beed/2020-2022, **सल्लागार संपादक : चंद्रकांत शेजुळ**